पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ७**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १९/५/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ११२**

मा.आबा बागुल यांचे दि.१४/५/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिका आकारत असलेल्या मिळकत करामध्ये A.R.V. (वार्षिक देय मुल्य) वर आरोग्य सेवा कर (Health Care Tax) हा ५% आकारण्यात यावा.

जेणेकरुन आरोग्य सेवा कर (Health Care Tax) मधून सांसर्गिक रोग व कोरोना सारखे संक्रमणशील आजारांसाठी हॉस्पिटल, ओपीडी सेंटर, ऑपरेशन थिएटर वेगळे करण्यासाठी ठोस पाउले उचलली जातील. अचानक उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक परिस्थितीशी सामना करणे व पुणे महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना आरोग्य विषयक सेवा देताना होणारा खर्च भागविणे यामुळे शक्य होईल.

आरोग्य सेवा कर (Health Care Tax) या कराची अंमलबजावणी सन २०२०-२०२१ आर्थिक वर्षापासून करावी. या करासाठी स्वतंत्र बजेट हेड निर्माण करुन मिळणारा कर वेगळा ठेवण्यात यावा.

सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेस शिफारसीसाठी सादर.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. ११३**

पुणे शहरातील विविध ठिकाणी COVID-19 च्या धर्तीवर उभारण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर व आवश्यकतेनुसार पुणे महानगरपालिका इमारतींची साफसफाई करणे (बी-२ पध्दत) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दिशा एजन्सी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु. १२.१२ रुपये प्रति चौरस फूट प्रती महिना (जी.एस.टी.सह) या दराने अंदाजे ५,२०,००० चौ.फुट क्षेत्र व ६ महिने मुदत गृहित धरुन सद्यस्थितीत र.रु.३,७८,१४,४००/- पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करार करणेस तसेच आवश्यकता भासल्यास L2 ठेकेदार मे.अभिषेक एन्टरप्रायजेस यांचेकडून L1 च्या दराने काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा व्यव./६२ दि.१३/५/२०२० चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ११४**

मा. दिलीप वेडेपाटील यांचे दि. ८/४/२०२० चे पत्र.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निवडणुक आचारसंहिता, स्वच्छ सर्व्हेक्षणाची कामे व कोरोना सारखा संसर्गजन्य आजार या बाबीमुळे ३ महिने कामकाज सुरळीत व वेळेत न झाल्याने या आर्थिक वर्षातील विकासकामांना ज्या कामाच्या निविदा प्रक्रिया झालेल्या आहेत अशा विकासकामांना मुदतवाढ मिळावी. कोरोना मुळे जी राष्ट्रीय आपत्ती देशभर निर्माण झालेली आहे ती विचारात घेवून ज्याप्रमाणे देशातील सर्वोच्च आर्थिक संस्था म्हणजेच भारतीय रिझर्व्ह बँकेने ज्या प्रकारे आर्थिक वर्ष २०१९-२०२० साठी मुदतवाढ दिलेली आहे. त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिकेने सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात ज्या विविध कामांच्या निविदा यापुर्वीच मागविलेल्या आहेत अशा सर्वच निविदांना मान्यतेसाठी व कामाची बिले खर्ची टाकण्यासाठी कोरोना बाबतचे राष्ट्रीय व राज्य सरकारच्या पातळीवर जो निर्बंध घालण्यात आलेले आहेत ते पुर्णत: उठलेल्या नंतर त्या दिनांकाच्या पुढे ०३ महिन्यांचे करिता मुदतवाढ देण्यात यावी.

(टिप : सदर विषयाचा विचार एक महिन्यानी करावा असे दि. १६/४/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ११५**

पुणे महानगरपालिकेकरिता Managed Cloud Service Provider या कामासाठी उपलब्ध नागरिकाभिमुख सेवासुविधा व दैनंदिन प्रशासकीय कामकाज विनाव्यत्यय चालू ठेवण्याच्या दृष्टीकोनातून मे. महाराष्ट्र शासन निर्गमीत मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भांकित शासन निर्णयातील तरतूदी व दर पत्रकानुसार M/s. ESDS Software Solutions Pvt. Ltd. या कंपनीची नेमणूक करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मावतं/५६ दि.५/५/२०२० चे पत्र.

१. मे. महाराष्ट्र शासन निर्गमीत मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भांकित शासन निर्णयानुसार M/s. ESDS Software Solutions Pvt. Ltd. यांचे मार्फत पुणे महानगरपालिकेस Cloud Services सदर नमूद शासन निर्णयातील तरतूदी नुसार, दरपत्रकानुसार, व सदर शासन निर्णय अमलात असल्याची नमूद कालावधी (दिनांक ०५/०१/२०२० ते ३०/०४/२०२१) पर्यंत उपलब्ध करून घेणेस.
२. मॅनेजड क्लाउड सर्व्हिस पुरविणेकरिता M/s. ESDS Software Solutions Pvt. Ltd. यांना कार्यादेश देणेस व मे. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस.
३. मे. महाराष्ट्र शासन निर्णयातील नमूद कालावधीत भविष्यातील बदलणाऱ्या शासन निर्णयातील दरानुसार पुणे मनपामार्फत घेण्यात येणाऱ्या Cloud Services चे बिल अदा करणेस.
४. पुणे मनपाच्या विविध विभागांच्या भविष्यातील गरजेनुसार व मागणीनुसार कमी अधिक प्रमाणात मे . महाराष्ट्र शासन निर्णयातील तरतुदीनुसार व दरपत्रकानुसार क्लाऊड सर्व्हिस कार्यान्वित करून बिल अदा करणेस.
५. पुणे महानगरपालिकेस आवश्यक असेलेले मॅनेजड क्लाऊड सर्व्हिस पुरविणेकरीता M/s. ESDS Software Solutions0 Pvt. Ltd. या कंपनीस प्रतिमहा अंदाजे र.रू. २७,६८,८५९=४५ अदा करणेस.
६. सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.
RE11N103
सन २०१९-२०२०
विशेष प्रकरचे हिशेबी कामे कॉम्प्यूटर करून घेणे,
ERE अंमलबजावणी, Software Development,
GIS, Works Management System, Kiosk व
तदनुषंगिक कामे करणे.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/५/२०२० च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ११६**

पुणे महानगरपालिकेत कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांना दि.२४/२/२०१५ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार विहित करण्यात आलेले किमान वेतन दरानुसार वेतन आदा करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद प्रस्तावास मा.स्थायी समिती मान्यतेच्या दिनांकापासून मान्यता मिळणेस व सदर खर्च संबंधित विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/एलओ/५९ दि.१३/५/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ११७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाय योजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा सणस ग्राऊंड बॉईज हॉस्टेल येथे लागण झालेल्या संशयित रुग्णांना नाष्टा व दोनवेळचे जेवण पुरविणे या कामाचे मे.द अक्षय पात्रा फाउंडेशन यांना देयक र.रु. ४,६६,४७५/- अदा करणेस व त्यानुसार करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६१ दि. १३/५/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ११८**

मा.वसंत मोरे यांचे दि.१४/५/२०२० चे पत्र.

कोविड–१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून संपूर्ण देशात दि.२४/३/२०२० पासून लॉकडाऊन जाहिर करण्यात आला आहे. लॉकडाऊनची परिस्थिती पाहता हातावर पोट असणारे, विविध व्यवसाय व नोकरी करणारे या सर्वांच्या उत्पन्नावर गदा आलेली आहे. तसेच लॉकडाऊनची परिस्थिती वाढत असून भविष्यात किती दिवस उत्पन्न मिळणार नाही याची शाश्वती देखील नाही. अशा परिस्थितीमध्ये संपूर्ण पुणे शहरातील मिळकतधारकांना मिळकत करामध्ये पुढील २ महिने सवलत देण्यात यावी. कोणालाही जप्तीच्या नोटीसा बजावू नये. तसेच मिळकत कर न भरल्यास महिना २ टक्के दंड आकारण्यात योतो, तो आकारण्यात येवू नये. ज्यामुळे सामान्य पुणेकरांना पुणे महापालिकेच्या वतीने मिळकत करामध्ये दिलासा मिळेल.

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**